आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८ ऑगस्ट २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जपान आणि चीनच्या दौऱ्यावर जाणार

अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त आयातशुल्काच्या संकटानंतरही कामगारांचे रोजगार कायम ठेवण्यावर भर देण्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं आवाहन

शक्तीपीठ महामार्गाचा कोल्हापूर जिल्ह्यातला नियोजित आराखडा राज्य सरकारकडून रद्द, पवनार ते सांगली दरम्यानच्या आखणीला मान्यता

**आणि**

जम्मू - काश्मिरमध्ये मुसळधार पावसानं जनजीवन अजूनही विस्कळीत, पाकिस्तानात पुरामुळं १७ जणांचा मृत्यू

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जपानला रवाना होणार आहे. १५ व्या भारत जपान वार्षिक शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासोबतची ही त्यांची शिखर परिषद आहे. संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार, तंत्रज्ञान, आणि नवोन्मेष यावर या बैठकीत चर्चा होईल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, प्रधानमंत्री मोदी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या आमंत्रणावरून ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला जातील. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री शिखर परिषदेत सहभागी होणाऱ्या अनेक नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेण्याची अपेक्षा आहे.

**<><><><>**

अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त आयातशुल्कामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अनिश्चितता निर्माण झाली आहे. या परिस्थितीत कामगारांना त्यांचा रोजगार कायम राहील याची खात्री द्यावी, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी उद्योजकांना केलं आहे. FIEO, अर्थात भारतीय निर्यातदार संघटनांच्या महासंघाच्या शिष्टमंडळानं आज त्यांची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जागतिक संकटातही कामगारांच्या

उपजीविकेचं रक्षण करणं महत्वाचं आहे, असं त्या म्हणाल्या. केंद्र सरकार देशातल्या निर्यातदारांच्या पाठीशी ठामपणे उभं राहील, त्यांच्या सर्व चिंता दूर करण्यासाठी आणि त्यांचं हित जपण्यासाठी शक्य ती सर्व पावलं सरकार उचलेल, अशी ग्वाही अर्थमंत्र्यांनी दिली.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कतारचे परराष्ट्र व्यापार खात्याचे राज्यमंत्री डॉ. अहमद बिन मोहम्मद अल सय्यद यांनी आज नवी दिल्लीत भेट घेतली. द्विपक्षीय संबंध दृढ करणे आणि गुंतवणूक वाढवण्यावर यावेळी चर्चा झाली.

<><><><>

भारत आणि सौदी अरेबियाच्या संरक्षण सहकार्य विषयक संयुक्त समितीची ७ वी बैठक आज नवी दिल्लीत झाली. संरक्षण सहकार्य वाढवण्यावर दोन्ही देशांनी वचनबद्धता व्यक्त केली आणि या आधीच्या बैठकीत झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीवर समाधान व्यक्त केलं.

<><><><>

केंद्र सरकारनं कच्च्या कापसावरच्या आयातशुल्कातल्या सवलतीला येत्या ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. देशातल्या वस्त्रोद्योग क्षेत्राला पुरेशा प्रमाणात कापूस उपलब्ध व्हावा, यादृष्टीनं हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ही मुदत ३० सप्टेंबरपर्यंत होती.

<><><><>

अमेरिकेनं लादलेल्या अतिरीक्त आयात शुल्काचा परिणाम देशातल्या शेअर बाजारांवर आजही दिसून आला. ७०५ अंकांनी कोसळून सेन्सेक्स ८० हजार ८१ अंकांवर बंद झाला. निफ्टी २११ अंकांची घट नोंदवून २४ हजार ५०१ अंकांवर स्थिरावला. माहिती तंत्रज्ञान, वाहन, ग्राहकोपयोगी वस्तू, धातू क्षेत्रातले समभाग आज घसरले.

<><><><>

आयआयपी, अर्थात औद्योगिक उत्पादन निर्देशांकांवर मोजला जाणारा, भारताच्या औद्योगिक उत्पादन वाढीचा दर गेल्या महिन्यात साडेतीन टक्क्यापर्यंत वाढला. जूनमधे हा दर दीड टक्के होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं जारी केलेल्या

आकडेवारीनुसार जूनमधे ३ पूर्णांक ७ दशांश टक्के असलेला कारखानदारी क्षेत्रातल्या वाढीचा दर जुलैमधे ५ पूर्णांक ४ दशांश टक्के झाला. वीजनिर्मिती क्षेत्रानं ६ दशांश टक्के अशी किरकोळ वाढ नोंदवली. खाण क्षेत्राची कामगिरी मात्र ७ पूर्णांक २ दशांश टक्क्यापर्यंत खाली आली.

**<><><><>**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी आज गुजरातमधल्या अहमदाबादजवळच्या साणंद इथं सीजी पॉवरच्या पहिल्या सेमीकंडक्टरच्या बाह्यकंत्राटी जुळवणी आणि चाचणी सुविधेचं उद्घाटन केलं. हा प्रायोगिक प्रकल्प भारताच्या सेमीकंडक्टर उद्योग क्षेत्राच्या वाटचालीतला एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

- **- Hold - byte - -**

२०३२ पर्यंत जगभरात सेमीकंडक्टर क्षेत्रात कुशल व्यावसायिक तज्ज्ञांची कमतरता भासण्याचा अंदाज व्यक्त होत आहे, या पार्श्वभूमीवर देशात कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याकरता केंद्र सरकारनं देशभरातल्या २७० विद्यापीठांना अत्याधुनिक चिप उत्पादन तंत्रज्ञानानं सुसज्ज केलं असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री जन धन योजनेला आज ११ वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट २०१४ ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाची सुरूवात केली होती. देशातल्या सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठीची ही सर्वसमावेशक योजना आहे. या योजनेअंतर्गत ५६ कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली असून, बँकिंग सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत.

**<><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातला शक्तीपीठ महामार्गाचा नियोजित आराखडा राज्य सरकारनं रद्द केला आहे. यासंदर्भातला शासन आदेश आज सार्वजनिक बांधकाम विभागानं जारी केला. पवनार ते सांगली दरम्यानच्या आराखड्याला मान्यता देतानाच, शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड आणि आजरा तालुक्यात या महामार्गाच्या आखणीचे सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय चाचपण्याचे आदेश राज्य सरकारनं राज्य रस्ते विकास

महामंडळाला दिले आहेत. या पर्यायांबाबत कोल्हापुरातले मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अंतिम निर्णय घेणार आहेत.

शक्तीपीठ महामार्गासाठी भूसंपादनाला आणि महामार्गासाठी सुमारे २१ हजार कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता सरकारनं दिली आहे. सुमारे ८०२ किलोमीटर लांबीच्या या महामार्गामुळं नागपूर-गोवा हा १८ तासांचा प्रवास ८ तासात होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

मराठा किंवा ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, दोन्ही समाजाचे प्रश्न शासन सोडवेल, याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केला.

**- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

दहा टक्के आरक्षण दिल्यावरही मराठा समाजाच्या आंदोलनाचं कारण कळलेलं नाही. लोकशाहीच्या चौकटीत या मागणीवर काय तोडगा काढता येईल ते पाहू. ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळाल्यावर मराठा समाजाला कितपत फायदा मिळेल याबाबत शंका आहे, त्यामुळे मागणीचा पुनर्विचार मराठा समाजातल्या विचारवंतांनी करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

विरारमध्ये एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे. तर ९ जण जखमी झाले. आज संध्याकाळी एनडीआरफनं शोधकार्य थांबवलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सातही आरोपींची सुटका करण्याच्या न्यायालयाच्या निर्णयावर याचिका दाखल करण्याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याचं एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

सध्या याबाबत कायदेशीर मतं घेतली जात असून त्यानुसार पुढं निर्णय होईल, असं दुसऱ्या एका अधिकाऱ्यानं सांगितलं.

**<><><><>**

जम्मू- काश्मीरमध्ये जम्मू-श्रीनगर महामार्ग आज सलग तिसऱ्या दिवशीही वाहतुकीसाठी बंद राहिला. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशननं महामार्ग मोकळा करण्याचं काम युद्धपातळीवर हाती घेतलं आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन जम्मू भागातल्या शाळा येत्या शनिवारपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश प्रशासनानं दिले आहेत. वैष्णोदेवी यात्रा देखील सलग तिसऱ्या दिवशी स्थगित करण्यात आली.

**<><><><>**

पाकिस्तानमध्ये पंजाब प्रांतात आलेल्या पुरामुळे शेकडो गावं पाण्याखाली गेली असून गेल्या २४ तासांत किमान १७ लोकांचा मृत्यू झाला आहे. यात सियालकोटमध्ये सात, गुजरातमध्ये चार, नारोवालमध्ये तीन, हाफिजाबादमध्ये दोन आणि गुजरांवालामध्ये एकाचा समावेश आहे. सतलज, रावी आणि चिनाब नद्यांना आलेल्या पुरामुळे १३ कोटींहून अधिक लोकांचं स्थलांतर केलं आहे. तसंच लाखो एकर शेती जमीन पाण्याखाली गेली आहे.

**<><><><>**

भारत आणि बांगलादेशानं परस्परांच्या सीमांपलीकडून होणाऱ्या गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी संयुक्त प्रयत्न अधिक तीव्र करण्यावर सहमती दर्शवली आहे. यासाठी दोन्ही देशांच्या सीमांवर अधिक कठोर देखरेख, समन्वयित गस्तीमध्ये वाढ आणि गुप्तचरांकडून मिळालेल्या प्रत्यक्ष त्या त्या वेळच्या माहितीचे आदानप्रदान करण्याला दोन्ही देशांनी मान्यता दिली आहे. बांग्लादेशात ढाका इथं बांग्लादेशाच्या सीमा सुरक्षा दलाच्या मुख्यालयात चार दिवसांची महासंचालक स्तरावरची सीमा परिषद झाली. त्यानंतर दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन जारी केलं, त्यात दोन्ही देशांनी याबद्दलची वचनबद्धता व्यक्त केली आहे. या परिषदेत भारताच्या सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक दलजित सिंग चौधरी यांनी भारताच्या शिष्टमंडळाचं, तर बांग्लादेशाच्या सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक मेजर जनरल मोहम्मद अश्रफुज्जामान सिद्दिकी यांनी त्यांच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व केलं.

**<><><><>**

बांग्लादेशातल्या विद्यार्थ्यांनी देशभरातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची सर्व विद्यापीठं आणि महाविद्यालयांमधलं शैक्षणिक कामकाज स्थगित करण्याची घोषणा केली आहे. ढाका इथं निदर्शनं करत असलेल्या विद्यार्थ्यांवर पोलीसांनी लाठीचार्ज केल्याचा, आणि त्यानंतर विद्यार्थी तसंच पोलीसांमध्ये संघर्ष झाल्याचं वृत्त आहे. या घटनेनंतर,

विद्यार्थी नेत्यांनी रात्री उशिरा शैक्षणिक कामकाज स्थगित करण्याची घोषणा केली, तसंच नागरिकांचा त्रास कमी करण्याच्या उद्देशानं रस्त्यांवरचे ब्लॉक हटवले आहेत.

**<><><><>**

पॅरिसमध्ये सुरू असलेल्या जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या पी. व्ही. सिंधुनं जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या, चीनच्या वँग झी यी ला पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिशा क्रस्टो यांनी हाँगकाँगच्या टँग चून मन आणि त्से यींग सुएट या जोडीवर धक्कादायक विजय मिळवला.

**//<><><><>//**